महासत्ता

# विद्यार्थिनींनी चिमुकल्यांना दिले सायबर सुरक्षेचे धडे

बेडकिहाळ,ता.१२(वार्ताहर)-

..........................

सध्याच्या डिजिटल युगात लहान मुलांमध्येही इंटरनेट व मोबाईलच्या सुरक्षित वापराबाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे झाले आहे. याच उद्देशाने चूक हेल्ल फाउंडेशनतर्फे राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत बेडकीहाळ येथील कन्नड प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात देवचंद कॉलेजच्या विद्यार्थिनी ज्ञानश्री दळवी, साक्षी जाधव यांनी लहान मुलांना त्यांच्या वयोगटाला समजेल अशा सोप्या, मनोरंजक आणि प्रभावी पद्धतीने सायबर सुरक्षेची माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, खोटे मेसेज, संबंधित फसवणूक, सोशल मीडिया संबंधित धोके आणि विविध प्रकारच्या ऑनलाइन फ्रॉडची प्राथमिक माहिती देण्यात आली. यावेळी शाळेतील शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.